MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

यांच्या संयुक्त विद्यमाने

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद

२७/०२/२०२०

# राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

समन्वयक

प्रा. तानाजी बोराडे

डॉ. दयानंद शिंदे

डॉ. किशोरकुमार गव्हाणे

प्राचार्य

डॉ. श्रीकृष्ण चंदनशिव

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

36) शाहु, फुले, आंबेडकर यांचे समाजिक विचार
प्रा. डॉ. कांबळे बी. व्ही., लातूर ||117

37) म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर : साम्यभेद
डॉ. विठ्ठल केदारी, अंबाजोगाई ||120

38) राजर्षी शाहू एक दूरदृष्टी शिक्षण तज्ञ
डॉ. चांगदेव निवृत्ती मुंढे, जालना ||123

39) राजर्षी शाहु महाराज आणि स्त्री मुक्ती कायदे
प्रा. राजगुरु गौतम धनाजी, अहमदनगर ||127

40) शाहु, फुले, आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार
बर्डे भागवत, अरविंद मिसाळ, औरंगाबाद ||130

41) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार
प्रा डॉ. कार्तिक पोळ, तुळजापूर ||133

42) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार
सदाफुले डी. एल., बीड ||135

43) राजर्षी शाहू छत्रपती यांचे सामाजिक विचार
प्रा.डॉ. अनिल हजारे, बीड ||138

44) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातिअंतासंबंधी विचार
श्री. समाधान विठ्ठल लोंढे, बार्शी ||140

45) शाहु, फुले, आंबेडकर यांचे राजकीय विचार
डॉ. एच. भूमकर, बीड, औताडे लक्ष्मण, औरंगाबाद ||142

46) भारत के बुनियादी क्रांति के महापुरुष – महात्मा जोतीराव फुले
प्रा.डॉ. पुंजाराम भगोरे, औरंगाबाद ||145

47) राजर्षि शाहू महाराज और नारी सुरक्षा कानून
अमोल ज्ञानोबा लांडगे, लातूर ||148

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication

February 2020
Special Issue-07



39

# राजर्षी शाहु महाराज आणि स्त्री मुक्ती कायदे

**प्रा.राजगुरु गौतम धनाजी**
सा.प्राध्यापक, इतिहास विभाग,
दादा पाटील महाविद्यालय कर्जत, अहमदनगर

**********

**प्रस्तावित**

भारतीय सामाजिक जिवनात स्त्री हा वर्ग पहिल्यापासूनच उपेक्षीत आणि सर्व दृष्टीने मागासलेला आहे. आपल्या पुरुष प्रधान समाज्यातल्या स्त्रीयांनवर विविध प्रकारचे अन्याय, अत्याचार, हे बालविवाह, विधवा विवाह प्रतिबध, शिक्षण बंदी, पडदा पध्दती, सतीची चाल इ. पारंपारीक रुढीपरंपरांच्या माध्यमातून होत असत. त्यांना या रुढी परंपराने त्यांचे जीवन असहाय्य व परावलंबी बनवलेले दिसून येते. सामाजिक जीवनात समता प्रस्थापित करण्याकरीता स्त्रीयांच्या स्थीतीत सुधारणा करणे महत्वाचे आहे. स्त्रीयांच्या स्थितीत सुधारणा करण्याकरीता प्राचीन काळापासून प्रयत्न झालेले आपणास दिसून येतात. भारतात होवून गेलेल्या साधू संतांनी, समाजसुधारकांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या स्त्रीयांच्या स्थितीत सुधारणा करण्याकरीता प्रयत्न केलेले दिसून येतात. परंतु त्यांना म्हणावे तसे यश मिळालेले दिसत नाही.

आधुनिक काळात पाश्चात ज्ञानाच्या माध्यमातून एतदेशीय सुशिक्षीत होवून त्यांनी स्त्रीयांच्या जीवनात सुधारणा करण्याकरीता प्रयत्न केलेले दिसून येतात. यामध्ये महात्मा फुले, राजा राममोहनराय, मलबारी बेहरामजी, र.धो.कर्वे, पंडीता रमाबाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहुमहाराज यांनी स्त्रीयांच्या सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी व त्यांना समाजात सन्मानाने जीवन जगण्यासाठी महत्वपुर्ण कार्य केले.

महाराष्ट्रात स्त्रीमुक्ती चळवळीचे उद्गाते म्हणून महात्मा फुले यांचे नाव घ्यावे लागते. त्यांच्याच कार्याचा पुढे वारसा हा राजर्षी शाहुमहाराजांनी चालविलेला आपणास दिसून येतो. राजर्षी शाहु महाराज हे विसाव्या शतकातील महत्वाचे कर्ते क्रांतीकारक सुधारक होवून गेलेले आपणास दिसून येतात. त्यांनीच सामाजिक जीवनात समता प्रस्थापित करण्याकरीता दलित उध्दाराचे, जाती निर्मुलनाचे, तसेच स्त्रीयांचा उध्दार करण्याकरीता महत्वपुर्ण योगदान दिलेले आपणास दिसून येते त्यांनी स्त्रीयांना समाजात मानाचे स्थान मिळवून देण्याकरीता शाळा, महाविद्यालये, वस्तीगृहे काढली. तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी आपल्या कोल्हापुर संस्थानात स्त्रीयांच्या हक्कासाठी कायदे केलेले दिसतात. त्यांनी या कायद्यांच्या माध्यमातून स्त्री उध्दाराचे महत्वपुर्ण कार्य केले.

**अल्प परिचय :—**

राजर्षी शाहु महाराज यांचा जन्म कागल परगण्याचे जहागीरदार जयसिंगराव घाटगे व त्यांच्या पत्नी राधाबाई या दांपत्याच्या पोटी २६ जुन १८७४ रोजी झाला. त्यांचे मुळनाव हे यशवंतराव घाडगे होते.

इ.स. १७०८ मध्ये कोल्हापुर या स्वातंत्र संस्थानाची स्थापना झाली या संस्थानाचे राज्यकर्ते चौथे शिवाजी यांचा विनाअपत्य मृत्यू झाल्यामुळे संस्थानाचा राज्यकारभार चालविण्याकरीता दत्तक घेण्याच्या निवडीतून चौथे शिवाजी महाराज यांच्या पत्नी आनंदीबाई साहेब यांनी जहागिरदार जयसिंगराव घाटगे यांचे पुत्र यशवंतराव यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले दत्तक घेतल्यानंतर यशवंतरावांचे नामकरण शाहु छत्रपती करण्यात आले. शाहुंचा दत्तक म्हणून राज्यात येण्यापुर्वीच शिक्षणाला प्रारंभ झाला होता. सर स्टुअर्ड फ्रेअर, आणि सर रघुनाथराव व्यंकाजी सबनीस हे त्यांना शिक्षक लाभले त्यांनी त्यांना इंग्रजी भाषा, राजकारण, जगाचा इतिहास इ. विषयाचे सखोल ज्ञान दिले शाहू महाराज शिक्षणाबरोबरच कुस्ती, शिकार व घोडेस्वारी यात त्यांनी प्राविण्य मिळविले होते. महाराजांनी मा. फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे पुर्नजीवन करुन स्त्री मुक्ती चळवळीचा वारसापुढे चालवलेला दिसतो.

**स्त्री विकासाचे कार्ये :—**

राजर्षी शाहु महाराज हे सामाजिक समतेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी या सामाजिक समतेसाठी स्त्री उध्दाराचे कार्य हाती घेतलेले दिसते. त्यांना या कार्याची प्रेरणा हि पाश्चात शिक्षण व महात्मा फुले यांच्याकडून मिळालेली होती. त्यांनी स्त्रीयांचा उध्दार करण्याकरीता



CamScanner

आपल्या संस्थानात निश्चित असा कार्यक्रम आखलेला दिसून येतो. त्यासाठी त्यांनी काही महत्वपूर्ण कायदे केलेले होते. तसेच स्त्रीयांचा उद्धार करण्याकरीता त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता. त्यासाठी त्यांनी शिक्षण संस्थांची निर्मिती केली तसेच समाजातील स्त्री विरोधी रुढी परंपरा विरुद्ध आवाज उठविलेला दिसून येतो. स्त्री उद्धारासाठी त्यांनी पुढील कार्य केले.

**स्त्री शिक्षण :–** राजर्षी शाहु महाराजांच्या मते 'शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाचा विकास अशक्य आहे''. शिक्षणाच्या माध्यमातूनच सामाजिक समता प्रस्थापित होण्यास मदत होवू शकते. यासाठी त्यांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यासाठी त्यांनी स्त्रीयांबरोबरच सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. यासाठी आदेश जारी केले ते फक्त आदेश जारी करुन थांबले नाहीत. तर त्यांनी ज्या पालकाचे मुल शाळेत अनुपस्थित राहत त्यांना दंड लावला. व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली.

महाराजांनी स्त्रीयांच्या प्राथमिक शिक्षणाबरोबरच उच्च शिक्षणाला प्रोत्साहन दिले. त्यांनी स्त्रीयांना वैद्यकीय शिक्षण घेण्याकरीता मुंबई, पुणे, मद्रास तसेच परदेशात जाण्यासाठी आर्थिक सहाय्य केले. महाराजांनी स्त्रीयांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्याकरीता त्यांनी फेलोशीप व शिष्यवृत्या सुरु केल्या. त्यांनी स्त्रीयांसाठी वसतीगृहांची स्थापना केली. अशा प्रकारे त्यांनी स्त्री शिक्षणाकरीता महत्वपुर्ण कार्य केले.

**स्त्री संरक्षणाचे कायदे**

विसाव्या शतकात महाराष्ट्रातील समाजात स्त्री वर्ग हा उपेक्षित व सर्व दृष्टीने मागासलेला होता. समाज हा पुरुष प्रधान संस्कृतीवर आधारीत होता. स्त्री वर्गावर अनेक प्रकारचे अन्याय व अत्याचार हे परपरांच्या माध्यमातून केले जात होते. समाजात सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी कायदयाची मदत घेतल्याशिवाय पर्याय नाही. हे जाणून महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्रीयांसाठी नविन कायदयांची अंमलबजावणी केली. महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणाबरोबरच त्यांच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करण्याकरीता अनेक कायदे अंमलात आणून स्त्रीयांचे समाजाकडून आणि कुटूंबाकडून होणारा अत्याचार दुर करण्याचा प्रयत्न हा कायदयाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्यांनी पुढील कायदे केले.

**अ. विधवा पुर्नविवाह कायदा:–** शाहु महाराजांच्या मते, ''समाजाच्या स्वास्थासाठी विधवा विवाहास कायदेशीर मान्यता असणे आवश्यक आहे''. तत्कालीन समाजातील मागास जातीत विधवा पुर्नविवाहाचे स्वातंत्र्य होते परंतु ते उच्च जातीत नव्हते उच्च वर्गीयात विधवांचे जीवन हे कष्टदायक होते. त्यात सुधारणा करण्याकरीता शाहुमहाराजांनी आपल्या संस्थानात जुलै १९१७ मध्ये विधवा पुर्नविवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा केला. तसेच या कायदयानुसार विवाहाची कायदेशीर रित्या नोंद करण्याचे पध्दती सुरु केली गेली. यामुळे या विवाह विधीचा कायदेशीर पुरावा अस्तित्वात राहु लागला या कायदयामुळे विधवा स्त्रीयांना विवाहाचे हक्क बहाल आले हे महाराजांचे क्रांतीकारक पाऊल होते.

**ब. अंतरजातीय विवाह कायदा:–** शाहु महाराजांची समाजातील विषमता नष्ट करण्याकरीता त्यांनी आंतरजातीय विवाहांचा पुरस्कार केला व त्यासाठी त्यांनी कायदे केलेले आपणास दिसून येतात. महाराजांनी आपल्या संस्थानात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी जुलै १९१९ ला 'अंतरजातीय विवाह कायदा' लागू केला. या कायदयाच्या माध्यमातून हिंदु व जैन या मुख्यधर्माच्या लोकांना जातीनिर्बंध न पाळता विवाह करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले अशा आंतरजातीय विवाहाचे सरकार दरबारी कायदेशीर नोंद ठेवली जात. या कायदयातील एका कलमाच्या अन्वये विवाह करण्याचे स्त्री – पुरुषाचे वय निश्चीत केले गेले. विवाह प्रसगी पुरुषाचे वय १८ व मुलीचे वय १४ वर्षे पुर्ण असावे असे निश्चित केले गेले. या कलमामुळे बालविवाह पध्दतीला आळा बसला. तसेच या कायदयाच्या अंतर्गत कलमाव्दारे १८ वर्षे पुर्ण असलेल्या स्त्रीला विवाहासाठी वर निवडण्याचे स्वातंत्र्य मिळाले हे या कायदयाचे वैशिष्टये होते. या कायदयाअंतर्गत होणाऱ्या विवाहांची रितसर नोंदणी सरकार दरबारी केली जात. एकूणच हा कायदा म्हणजे स्त्री पुरुषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा होता.

**क. स्त्री छळ विरोधी कायदा :–** समकालीन समाजात आणि कुटूंबात पती व त्यांचे नातलग यांच्याकडून स्त्रीचा अनेक प्रकारे छळ होत

असे त्यासाठी महाराजांनी छळाचा कोणताही प्रकार न्यायाच्या चौकटीतून सुटणार नाही यासाठी त्यांनी सर्वसमावेशक अशा कायदा ऑगस्ट १९१९ मध्ये कोल्हापुर सरकारच्या गॅजेट मध्ये जारी केला. छळ कशाला म्हणावे हे ठरवण्याचे यादी जारी करण्यात आली. या कायदयात एकूण ११ कलमांच्या माध्यमातून स्त्रीला छळाची वागणूक देणाऱ्यास ६ महिन्याचा कारावास व २०० रु. पर्यंत दंड अशा शिक्षेची तरतूद करण्यात आली होती.

**ड. घटस्फोट व वारसाचा कायदा :—** समकालीन सामाजिक जीवनात घटस्फोट घेणे हे जात पंचायतीच्या लहरीवर अवलंबून होते. हे स्त्रीवर अन्याय करणारे होते. यात सुधारणा करण्याकरीता महाराजांनी आपल्या संस्थानात घटस्फोट संबंधी कायदा लागू केला या कायदयाअन्वये स्त्री च्या हक्कांचे संरक्षण कशा प्रकारे होईल. तसेच घटस्फोटानंतरतीच्या अन्न, वस्त्र खर्चाची योग्य ती सोय कशी केली जाईल. यानुसार कायदयाचे कलमे तयार केली होती. तसेच वैवाहिक संतती असेल तर त्यांच्या ताब्याबद्दलची, पोटगी बद्दलची व शिक्षणाबद्दलची व्यवस्था हि या कायदयाने लावली होती. १९२० ला 'हिंदू वारसाच्या कायदयाच्या दुरुस्तीचा कायदा' या नावाचा सामाजिक सुधारणेचा कायदा प्रसिध्द केला. या कायदयानुसार शुद्रांची अनौरस संतती व ब्राम्हण, क्षत्रीय व वैश्य या तीन वरीष्ठ वर्गाचे अनौरस संतती यांना मिळणाऱ्या हक्कातील फरक काढून टाकला गेला. सर्व वर्णाच्या अनौरस संततींना जनक पित्याच्या मिळकतीत वारसा हक्क दिला गेला.

**इ. देवदासी प्रथा प्रतीबंध कायदा :—** २० व्या शतकात समाजात कनिष्ट वर्गात देवाच्या नावावर मुली सोडण्याचे अनिष्ठ प्रथा मोठया प्रमाणात अस्थित्वात होती. या प्रथेच्या माध्यमातून समाजात जोगतीण, मुरळी, देवदासी, भावीण इ. प्रकारच्या पतीत स्त्रीयांचा वर्ग अस्थित्वात आलेला होता. या वर्गाला जरी देवाच्या नावाने सोडले गेले तरी त्यांचा उपभोग हा समाजातील लोक घेत असत. या मुली जेव्हा देवाला सोडल्या जात तेव्हा त्यांच्या घराशी संबंध राहत नसे. तसेच त्यांचा आई वडीलांच्या संपत्तीत वारसा हक्क राहत नसे. पण त्यांना देवाला सोडल्यामुळे संबंधीत देवस्थानाचे काही विशिष्ठ हक्क मिळत असत. हे सर्व हक्क हिन प्रकारचे असत. त्याला समाजाची व परंपरांचे मान्यता होती. याला शाहू महाराजांनी विरोध दर्शवून देवदासींच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी ''देवदासी प्रथा प्रतिबंधक कायदा'' अंमलात आणला या कायदयाने त्यांच्या सामाजिक जीवनात परिवर्तन घडवून आणले. तसेच त्यांना आपल्या मातापितांच्या मिळकतीत वारसाचे हक्क प्राप्त झाले.

**समारोप :—** राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्याकरीता बहुजन, पददलित, व स्त्रीवर्गाचा उद्धार करण्याकरीता महत्वपुर्ण योगदान दिलेले आपणास दिसून येते. महाराजांनी स्त्रीयांना सन्माननिय स्थान आणि त्यांना समाजात सन्मान आणि प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी स्त्री शिक्षण व त्यांच्या नैसर्गिक हक्कासाठी आपल्या कोल्हापूर संस्थानात महत्वपुर्ण कायदे केलेले दिसून येतात. समकालीन भारतावर ब्रिटीशांचे राज्य असताना देखील त्यांनी स्त्री वर्गासाठी कोणत्याही प्रकारचे कायदे केले नसतानाही महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्रीयांसाठी महत्वपुर्ण कायदे केलेले दिसतात. यावरून त्यांचे विचार किती आधुनिक होते याची कल्पना येते. यांच्याच विचारांचा वारसा पुढे अन्य समाज सुधारकांनी चालविलेला दिसतो. एकूणच शाहू महाराज हे एक आदर्श राजा, बहुजन, पददलित आणि स्त्रीयांचे कैवारी म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांचे कार्ये फक्त संस्थानापुरते मर्यादित न राहता ते भारतभर पसरले. सामाजिक सुधारणेमुळे ते कल्याणकारी व जाणता राजा म्हणून भारतीय इतिहासात त्यांनी आपले ओळख निर्माण केलेली आहे.

संदर्भ :—

१. कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्याप्रकाश औरंगाबाद, २००५

२. किर धनंजय, राजर्षी शाहु छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९७९

३. पवार जयसिंगराव (संपा.) राजर्षी शाहु छत्रपतींचे जाहिरनामे व हुकूमनामे, सुमेरु प्रकाशन, मुंबई २०१०

४. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहु छत्रपती— जीवन व कार्ये, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापुर, २०१७

५. पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहु स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापुर, २००१

६. लठ्ठे आ.बा, श्री. शाहू छत्रपती यांचे चरित्र, कोल्हापूर, १९२५

□□□